CNRNO.MHSO060004162019

**नियमित दिवाणी दावा क्र.४०/२०१९**

काकासो नाना मासाळ

*विरुध्द*

जिल्हाधिकारी, सोलापूर, वगैरे

## निशाणी क्र.५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने, प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेशी संगनमत करुन कॅनॉल संपादित रस्त्यावरुन वादीस जाण्या–येण्यासाठी हरकत व अडथळा करु नये याकरिता तसेच ५ ते ९ यांचेविरुध्द गट क्र. ३६३/१ च्या पुर्व बांधावरील मातीच्या ताली फोडु नये व अतिक्रमण करु नये याकरिता तात्पुरता मनाई हुकूम मागितलेला आहे. या अनुषंगाने हा अर्ज निर्णित करण्यात येतो.

२. **वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे** –

वादीचे कथन आहे की, केसकरवाडी गट क्र.३६३ पैकी १ हे. ७१ गुंठे व पो.ख. ०.०४ गुंठे क्षेत्र शासनाने भूसंपादन करुन उजनी उजवा मुख्य कालवा पुर्वपश्चिम चालीचा तयार केला आहे. त्यातुन शेतकरी पाणी घेतात. सदरील कॅनॉलच्या दक्षिण व उत्तर बाजुस बरेचसे संपादित क्षेत्र शिल्लक राहिलले आहे. सदरील संपादित क्षेत्राच्या रस्त्याचा वापर वादी व प्रतिवादी क्र.१४ हे गट क्र.३६३/१ मध्ये जाणे–येणेसाठी करतात. सदर वितरिकेच्या पश्चिम बाजुस व उत्तर बाजुच्या साईड पट्टीलगत सेवापथ तयार केलेला आहे. (सदरील रस्त्याइतपतच वाद असल्याने इतर बाबी नमुद करण्यात येत नाही)

३. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी प्रतिवादी क्र.२, ३ व ४ यांना हाताशी धरुन कॅनॉलच्या संपादित क्षेत्रात अतिक्रमण करण्याचा व वादीस रस्त्यावरुन जाणे–येण्यास अडथळा करण्याचा प्रयत्न केला. त्यास वादीने हरकत घेतली. तथापि,

प्रतिवादी क्र.५ व ६ विरुध्द कार्यवाही झालेली नाही. तसेच सदरील कॅनॉलच्या मध्यापासुन उत्तर बाजुस ७५ मीटर व दक्षिण बाजुस ७५ मीटर इतकी संपादित क्षेत्राची हद्द आहे. त्यावरील अतिक्रमणाबाबत विचारणा केली असता, प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी वादीस दाद दिली नाही. त्याकरिता प्रतिवादी क्र.१ ते ४ व ५ यांना वादीने नोटीस पाठविली. वादीचे कथन आहे की, कॅनॉलच्या संपादित क्षेत्रातुन वादीच्या जमिनीत जाणे–येणेसाठी रस्ता असुन, अतिक्रमण झाल्यास वादीस शेतमालाची वाहतूक करता येणार नाही. करिता, वादीने दावा दाखल केला असुन, वादी सदरील रस्त्याबाबत तात्पुरता मनाई हुकूम मागत आहे.

४. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.५ ते ९ हे जमिन गट क्र. ३६३/१ च्या पुर्वेकडील बांध उकरुन अतिक्रमण करीत आहेत. त्यामधील मातीच्या मोठ्या ताली फोडण्यास त्यांनी सुरुवात केलेली आहे. प्रतिवादी क्र.५ हा विनाकारण त्याबाबत वाद करत आहे. करिता, सदरील ताल फोडुन प्रतिवादी क्र.५ ते ९ यांनी वादीच्या जमिनीत अतिक्रमण न करण्याकरिता तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याची विनंती वादी करतो.

**<u>प्रतिवादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :–**

५. प्रतिवादी क्र.५ व ६ दाव्यात हजर झाले व त्यांनी त्यांची कैफियत तसेच म्हणणे (निशाणी क्र.२९) दाखल केले. प्रतिवादी क्र.७ चे वारसांनी प्रतिवादी क्र.५ व ६ यांची कैफियत स्वीकारल्याची बाब निशाणी क्र.११३ वरील आदेशावरुन दिसते. इतर प्रतिवादी हजर झालेले नाहीत. प्रतिवादींनी दाव्यातील तसेच अर्जातील सर्व प्रतिकूल कथने नाकारली. प्रतिवादींनी कथन केले की, पूर्वी वादीचे दावे फेटाळण्यात आलेले आहेत. प्रस्तुत दावा कायद्याने चालणारा नाही. वादमिळकतीचे वर्णन चुकीचे आहे.

६. प्रतिवादींचे कथन आहे की, गट क्र.३६३/२ हा वादाचा विषय नाही. केवळ प्रकरण लांबविण्यासाठी वादीने न्यायालयीन आयुक्ताचा अर्ज केलेला आहे. दावा या न्यायालयात चालु शकत नाही. वादी व प्रतिवादी क्र.१४ एकत्रात राहतात. नियमित दिवाणी दावा क्र.७२/२०१८ मधील वादीचा अर्ज नामंजुर झालेला आहे. वादी कायदेशीर प्रक्रियेचा

गैरवापर करीत आहे. करिता, अर्ज नामंजुर करण्यात यावा.

७. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होत असून, त्यावरील निष्कर्ष मी त्याखाली नोंदविलेल्या कारणांसाठी देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी हक्क शाबित करतो काय ? | : | **होकारार्थी, केवळ रस्त्याबाबत** |
| २. | सोयीस्करतेचा तोल वादीच्या बाजूने आहे काय ? | : | **होकारार्थी, वरीलप्रमाणे** |
| ३. | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | : | **होकारार्थी, वरीलप्रमाणे** |
| ४. | काय आदेश ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ करिता :–**

८. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. प्रथमदर्शनी प्रकरण पहात असतांना कथनांचा दाखल कागदपत्रांच्या अनुषंगाने तुलनात्मक विचार करणे आवश्यक आहे. वादीने दाखल केलेली निशाणी क्र.४ वरील यादीसोबत अनुक्रमांक ११ वरील नोटीस पाहिली. त्यामध्ये उल्लेख आहे की, गट क्र.३६३ हे क्षेत्र दक्षिणोत्तर आहे. त्यातुन कालव्यासाठी कालवा मध्यापासुन उत्तर बाजुस ७५ मीटर व दक्षिण बाजुस ७५ मीटर क्षेत्र संपादित झालेले आहे. तसेच कालव्यास सेवापथ आहे. या अनुषंगाने वादीचा वादपत्रासोबत व प्रतिवादीचा निशाणी क्र.१७६ सोबत दाखल केलेला नकाशा पाहिला. त्यावरुन हे स्पष्ट होते की, पुर्व–पश्चिम कॅनॉल आहे. तसेच गट क्र.३६३/१ च्या पुर्वेस ३६३/२ हा आहे. तसेच गट क्र. ३६३/१ च्या पश्चिम बाजुने १० फुट रुंदीचा वादीचा वहिवाटीचा रस्ता आहे. सदरील बाब पाहता त्या रस्त्यावरुन वादीस कॅनॉलवर असलेल्या रस्त्यावर जाण्याचा हक्क

आहे हे प्रथमदर्शनी दिसते. कालव्याकरिता संपादित क्षेत्रातील रस्त्यावरुन जाण्यास वादीस अडथळा करण्याचा प्रतिवादी क्र.१ ते ४ वगळता इतरांना हक्क नसल्याचे प्रथमदर्शनी दिसते.

९. वादीने गट क्र.३६३ च्या पुर्वेकडील तालीबाबत उल्लेख केलेला आहे. तथापि, मातीच्या मोठ्या ताली किती फुट रुंद आहेत याबाबत कोणताही उल्लेख अथवा प्रथमदर्शनी पुरावा कागदपत्राद्वारे न्यायालयासमोर वादीने आणलेला नाही. करिता प्रतिवादी क्र.५ ते ९ यांचेविरुध्द सदरील तालीबाबत प्रकरण प्रथमदर्शनी वादीच्या हक्कात दिसत नाही.

१०. उपरोक्त विवेचन व दोन्ही बाजुंचे नकाशे तसेच दाखल फोटो पाहता वादीस गट क्र.३६३/१ मधील त्याचे जमिनीत जाण्यास कॅनॉलकरिता संपादित क्षेत्रातुन रस्ता असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याने केवळ रस्त्याइतपत मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर 'होकारार्थी' देत आहे.

**मुद्दा क्र. ४ करिता :–**

११. उपरोक्त मुद्दा क्र.१ ते ३ वर नोंदविलेल्या कारणांवरुन मी या निष्कर्षाप्रत येत आहे की, वादीने प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेविरुध्द मनाई हुकूमाच्या अर्जात त्यांचे प्रतिवादी क्र. ५ व ६ शी संगनमत असल्याचा उल्लेख केलेला आहे. तथापि, वादीचे सदरील कथन ग्राह्य धरण्यासाठी कोणतीही बाब प्रथमदर्शनी दिसत नाही. तसेच मातीच्या तालीबाबत प्रथमदर्शनी वादकथन ग्राह्य धरण्यास कोणतीही बाब वादीने न्यायालयासमोर आणलेली नाही. करिता, केवळ प्रतिवादी क्र. ५ व ६ यांचे इतपत अर्ज निशाणी क्र.५ अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. करिता, वरील विवेचनावरुन खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो

२. कॅनॉलसाठी संपादित जमिनीच्या रस्त्यावरुन वादीस त्याचे मिळकतीवर जाण्यासाठी सदरील संपादित जमिनीवरील रस्त्याच्या म्हणजेच सेवापथाच्या वापरास हरकत व अडथळा करण्यास प्रतिवादी क्र.५ व ६ यांना या दाव्याचा निकाल लागेपावेतो तात्पूरती मनाई करण्यात येते.

३. खर्च अंतिम निकालाच्या वेळेस विचारात घेण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित)

स्वाक्षरीत/-

(नीलेश सु. बुद्रुक)

दिनांक : २८.०४.२०२५

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | 2nd Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 07.05.2025 |
| (d) | Uploaded on | : | 07.05.2025 |